**<u>ठळक बातम्या</u>**

- दिवाळीनिमित्त अयोध्येत शरयू तिरावर आज २६ लाखापेक्षा जास्त दीप उजळणार, भगवान श्रीरामाच्या आगमनसाठी आयोध्यानगरी सज्ज

- चांद्रयान-२ नं सूर्याच्या पृष्ठभागावरून उत्सर्जित होणाऱ्या ‘कोरोनल मास इजेक्शन’ चा चंद्रावर पडणारा प्रभाव प्रथमच टिपला असून, हे विज्ञान क्षेत्रातलं ऐतिहासिक यश असल्याची इस्त्रोची माहिती

- अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यातला संघर्ष तात्काळ थांबवण्यावर दोन्ही देशांमध्ये सहमती

**आणि**

- भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यान, तीन सामन्यांची एक दिवसीय क्रिकेट मालिका आजपासून सुरू, पहिल्या सामन्यात भारतीय संघाची अडखळत सुरुवात

**<><><><><>**

भगवान श्री राम यांच्या आगमनाचा सोहळा साजरा करण्यासाठी उत्तरप्रदेशात शरयू नदीच्या किनाऱ्यावर आज संध्याकाळी भव्य दीपोत्सव साजरा होत असून, यासाठी अयोध्या नगरी सजली आहे. राम की पौडी इथल्या ५६ घाटांवर आज २६ लाखांपेक्षा जास्त दिवे प्रज्वलित केले जातील. या दिव्यांच्या प्रकाशात अयोध्या नगरीची अध्यात्मिक आणि सांस्कृतिक प्रतिमा जागतिक व्यासपीठावर उजळून निघेल. आज संध्याकाळी स्थानिक प्रशासनानं आयोजित केलेली भव्य शरयू आरती या कार्यक्रमाच्या दिमाखात आणखी भर घालेल.

दरम्यान, काल दिल्लीत प्रथमच अयोध्येच्या धर्तीवर दीपोत्सव साजरा करण्यात आला. कर्तव्यपथावर मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी या उत्सवाचं उद्घाटन

केलं. हा केवळ दीपोत्सव नाही, तर एका नव्या जाणिवेचा उत्सव असल्याचं त्या म्हणाल्या. हा दीपोत्सव म्हणजे आस्था आणि आधुनिकतेचा संगम असल्याचंही त्यांनी सांगितलं. या दीपोत्सवात दीड लाखापेक्षा जास्त दिवे प्रज्वलित करण्यात आले.

<><><><><>

दिवाळीच्या सणानिमित्त प्रवाशांची गर्दी लक्षात घेता भारतीय रेल्वे उत्तर भारतासाठी सतराशेपेक्षा जास्त विशेष गाड्या चालवत आहे. चेन्नईमधून १८ लाखापेक्षा जास्त प्रवासी उत्तरप्रदेश आणि बिहारला जात आहेत, त्यामुळे तामिळनाडू परिवहन विभागानं वीस हजारापेक्षा जास्त बसगाड्याही सुरू केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्लीतल्या रेल्वेस्थानकांची पाहणी केली. तिकीट खिडकी आणि शौचालयांची सुविधा केल्यामुळे एकावेळी ७५ हजार प्रवाशांच्या गर्दीचं व्यवस्थापन करणं शक्य झाल्याचं वैष्णव म्हणाले. विमानानं प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्याही सणाच्या काळात वाढली आहे.

<><><><><>

दिवाळीनिमित्त महाराष्ट्र आणि गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. दिवाळीचा सण अंधारावर प्रकाशाचा, अन्यायावर न्यायाचा आणि नकारात्मकतेवर सकारात्मकतेच्या विजयाचं प्रतीक असल्याचं राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. तसंच या निमित्त सर्वांना स्वदेशी उत्पादनांचा स्वीकार करण्याचं आवाहन राज्यपालांनी केलं आहे. पर्यावरण रक्षण, नैसर्गिक संसाधनांचा आदर आणि नैसर्गिक शेती यासारख्या शाश्वत जीवन मूल्यांचा अवलंब करून उज्ज्वल, समृद्ध आणि आत्मनिर्भर भारताच्या उभारणीत सहभागी होण्याचं आवाहनही राज्यपालांनी आपल्या संदेशात केलं आहे.

<><><><><>

बिहार विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडीतला जागावाटपाचा तिढा तेजस्वी यादव यांनी सोडवावा असं आवाहन काँग्रेसनं केलं आहे. निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत शुक्रवारी संपली. मात्र इंडिया आघाडीचं जागावाटपाचं सूत्र जाहीर झालं नाही. त्यामुळे पहिल्या टप्प्यात अनेक मतदारसंघात काँग्रेस, राजद आणि डाव्या पक्षांचे उमेदवार एकमेकांविरोधात लढत आहेत. दुसऱ्या टप्प्यातल्या जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत उद्या संपत आहे. या टप्प्यातल्या कुटुंबा मतदारसंघात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष राजेश राम यांच्याविरोधात उमेदवार जाहीर करण्याचा निर्णय राजदने घेतल्यामुळे संबंध अधिकच ताणले गेले आहेत. भारतीय कम्युनिस्ट पक्षानेही अनेक ठिकाणी काँग्रेसविरोधात उमेदवार उभे केले असून झारखंड मुक्ती मोर्चाने सहा ठिकाणी इंडिया आघाडीतल्या घटक पक्षांच्या उमेदवारांच्या विरोधात निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

चांद्रयान-२ नं आपल्या वैज्ञानिक उपकरणांच्या साहाय्यानं सूर्याच्या पृष्ठभागावरून उत्सर्जित होणाऱ्या ‘कोरोनल मास इजेक्शन’ चा चंद्रावर पडणारा प्रभाव पहिल्यांदाच टिपला असून, हे विज्ञान क्षेत्रातलं ऐतिहासिक यश असल्याचं इस्त्रो, अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं म्हटलं आहे. चांद्रयान-२ नं टिपलेल्या नोंदींमुळे चंद्राचं बाह्य क्षेत्र, चंद्रावरचं विरळ वातावरण आणि त्याच्या पृष्ठभागावर होणारा अवकाशातल्या हवामानाचा प्रभाव समजून घ्यायला सहाय्य होईल, असं बंगळुरू इथल्या इस्त्रोच्या मुख्यालयानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे. चांद्रयान-२ चं निरीक्षण चंद्रावरच्या वातावरणाबाबत वैज्ञानिक समज वाढवेल, तसंच भविष्यातल्या चांद्र मोहिमा आणि चंद्रावर मानवाच्या अधिवासाच्या योजनेत महत्वाची भूमिका बजावेल असं यात म्हटलं आहे. २२ जुलै २०१९ रोजी श्रीहरीकोटा इथून प्रक्षेपित करण्यात आलेल्या चांद्रयान-२ नं, २० ऑगस्ट २०१९

रोजी, चंद्राभोवतालच्या लंबवर्तुळाकार कक्षेत यशस्वीपणे प्रवेश केला होता. ७ सप्टेंबर २०१९ रोजी लँडिंगच्या प्रयत्नादरम्यान यानाचा विक्रम लँडरशी संपर्क तुटला होता, तरी ते  पूर्णपणे कार्यरत असून ते चंद्राच्या कक्षेत कार्यरत असल्याचं इस्त्रोनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

अफगाणिस्तान आणि पाकिस्तान सीमेवर गेले काही दिवस सुरु असलेला संघर्ष तात्काळ थांबवण्यावर दोन्ही देशांमध्ये सहमती झाली आहे. कतार आणि तुर्कीएच्या मध्यस्थीनं  काल दोहा इथं झालेल्या चर्चे दरम्यान दोन्ही देशांमध्ये ही सहमती झाली.  या चर्चे दरम्यान, दोन्ही बाजूंनी तात्काळ युद्धबंदीसाठी, तसंच दोन्ही देशांमध्ये कायमस्वरूपी शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित करण्याच्या उद्देशानं यंत्रणा निर्माण करण्यासाठी बैठक घेण्यावर  सहमती झाल्याचं कतारच्या परराष्ट्र मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

नागालँडमधली नॅशनलिस्ट डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पार्टी नागा पिपल्स फ्रंटमधे विलिन झाली असून मुख्यमंत्री नेफ्यु रियो यांना विधिमंडळ पक्षाचा नेता म्हणून निवडण्यात आलं आहे. त्यामुळे नागालँड विधानसभेत आता ६० पैकी ३४ आमदार नागा पिपल्स फ्रंटचे आहेत. नॅशनलिस्ट डेमोक्रॅटिक प्रोग्सेसिव्ह पार्टीच्या सहाव्य सर्वसाधारण सभेत  विलिनिकरणाचा निर्णय घेण्यात आला. या विलीनीकरणामुळे नागालँडमधल्या नागरिकांची प्रादेशिक राजकीय ओळख घट्ट होईल, असं मंत्री के जी केन्ये यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

वाशिम जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर आज पहाटे झालेल्या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला, तर ४ जण जखमी झाले.

जखमींवर वाशिम जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

**<><><><><>**

मुंबईतल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातल्या पर्यावरणपूरक ई- बग्गी सेवेला आज प्रारंभ  झाला. केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी दूरस्थ पद्धतीने याचं उद्घाटन केलं. या उपक्रमामुळे उद्यानात प्रदूषणमुक्त पर्यटनाचा आनंद मिळेल, आणि पर्यटनाला चालना मिळेल असं गोयल यावेळी म्हणाले. ही ई-बग्गी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या मुख्य प्रवेशदारापासून कान्हेरी गुंफांपर्यंत धावेल. त्यामुळे प्रवास जलद आणि सुखकर होईल, अशी अपेक्षा आहे.  वनमंत्री गणेश नाईक, यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलियातल्या तीन सामन्यांच्या एक दिवसीय क्रिकेट मालिकेला आजपासून पर्थ इथं सुरुवात झाली. पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून भारताला फलंदाजीसाठी पाचारण केलं. पण भारतीय फलंदाज पारशी चमक दाखवू शकले नाही. सलामीवर रोहित शर्मा ८ तर कर्णधार शुभमन गिल दहा धावा करून झटपट बाद झाले. तर विराट कोहलीला भोपळाही फोडता आला नाही. पावसामुळे सामना सुरू व्हायला उशीर झाला, त्यामुळे हा सामना ३२ षटकांचा खेळला जाईल.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या १६ षटकांमध्ये ४ बाद ५२  धावा झाल्या होत्या. दरम्यान पावसामुळे खेळ पुन्हा थांबवण्यात आला.

**<><><><><>**

महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज इंदुर इथं यजमान भारत आणि इंग्लंड यांच्यात सामना होणार आहे. दुपारी ३ वाजता हा सामना सुरू होईल.

//<><><><><>//